महाज्योती
जानदीप समतेचा

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**कार्यालय**

VANARTI


**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर**

**वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022**


जा.क्र/म/व/स्पर्धा-परीक्षा/१७८१/२०२६-२७ दि:-०४/१०/२०२६

# परिपत्रक

**विषय :- दि.०७ ते ०९ ऑक्टोबर २०२६ रोजी घेण्यात येणाऱ्या चाळणी परीक्षेकरिता महाराष्ट्र येथे परीक्षा केंद्र उपलब्ध करून देण्याबाबत.**

महाज्योती व वनार्टी संस्थेमार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या संघ लोकसेवा आयोग (नागरी सेवा), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा/अभियांत्रिकी सेवा/संयुक्त गट ब व क) तसेच लष्करातील सैनिक भरती परीक्षापूर्व प्रशिक्षणाकरिता विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी घेण्यात येणारी चाळणी परीक्षा दि.०७/१०/२०२६ ते दि.०९/१०/२०२६ रोजी नियोजित करण्यात आलेली आहे.

सदर प्रशिक्षणाकरिता अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थ्यांना दि.०७/१०/२०२६ ते दि.०९/१०/२०२६ रोजी घेण्यात येणाऱ्या चाळणी परीक्षेकरिता दिल्ली येथील परीक्षा केंद्र हवे असल्यास त्याबाबतचा अर्ज विद्यार्थांकडून मागविण्यात आलेले होते, त्याद्वारे विद्यार्थांच्या मागणीनुसार अर्ज केलेल्या सर्व विद्यार्थांना दिल्ली येथील परीक्षा केंद्र उपलब्ध करून देण्यात आलेले आहे, त्यानुसार ज्या विद्यार्थांना दिल्ली येथील परीक्षा केंद्र उपलब्ध करून देण्यात आलेले आहे व सद्यस्थितीत दिल्ली येथील परीक्षा केंद्रातून परीक्षा देणे शक्य नाही अशा सर्व विद्यार्थांना महाराष्ट्र येथे परीक्षा केंद्र उपलब्ध करून देण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे विद्यार्थांच्या मागणीनुसार ज्या विद्यार्थांना महाराष्ट्र येथील परीक्षा केंद्र उपलब्ध करून देण्यात आलेले आहे व आता दिल्ली येथून चाळणी परीक्षा देण्याकरिता इच्छुक आहे अशा विद्यार्थांना देखील दिल्ली येथे परीक्षा केंद्र उपलब्ध करून देण्यात येत आहे.

त्याकरिता विद्यार्थांनी सदर परिपत्रकासोबत प्रसिध्द करण्यात आलेली लिंक चा वापर करून हवे असलेल्या परीक्षा केंद्राकरिता योग्य तो पर्याय निवडून घ्यावे.

**नोट: सदर लिंक दि.०५/१०/२०२६ रोजी रात्री ०९:०० वाजता पर्यत उपलब्ध करून देण्यात येत आहे, सर्व संबंधित विद्यार्थांनी याची नोंद घ्यावी.**

**स्वा**
**(मिलिंद नारिंगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(महाज्योती), नागपूर**

**स्वा**
**(प्रशांत वावगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(वनार्टी), नागपूर**